दै. प्रजावाणी दि. 07.10.25

# बालकाचे अपहरण करणारे दोघे जण पोलिसांच्या ताब्यात

प्रतिनिधी • नांदेड



शहरातील गजबजलेल्या पिरबुऱ्हान येथील धार्मिक स्थळासमोर झालेल्या गर्दीचा फायदा घेऊन एका दीड वर्षीय बालकाचे अपहरण करणाऱ्या दोघा जणांना पोलिसांनी अटक केली. पळवून नेल्यानंतर सारखे रडत असलेल्या त्या बालकाला आई-वडील दिसताच त्याने झेप घेत रडणे थांबवले. या प्रसंगाने भाग्यनगर पोलिसही काही वेळ स्तब्ध झाले. दरम्यान मुलाच्या अपहरणाची घटना घडल्यानंतर पोलिसांनी रात्रभर • उर्वरित पान. २ वर

## आरोपींनी केली रेकी...

अपहरण करण्यापूर्वी आरोपींनी त्या भागातून दोन वेळा राऊंड मारला. सुरवातीच्या राऊंडमध्ये पल्सरला नंबर प्लेट होती. तर बालकाला कोठून पळवायचे हे निश्चित झाल्यानंतर नंबर प्लेट काढून टाकल्याचे सांगितले जाते.

## ओळख लपविण्याचा प्रयत्न

अपहरणाची घटना होऊन बरेच तास झाले होते. तोपर्यंत अपहरणकर्त्यांचे दुचाकीवरचे फोटो व्हायरल झाल्यानंतर ते फोटो आणि फुटेज त्यांनी सोशल मिडीयावर पाहिले. पोलीस मागे लागल्याने आपली काही खैर नाही हे लक्षात येताच आरोपींनी स्वतः ची कटींग करुन हेअर स्टाईल बदलली तर लहान बाळाची देखील कटींग केली.

# बालकाचे अपहरण करणारे दोघे जण पोलिसांच्या ताब्यात

अनेक ठिकाणे शोधून काढली. परंतु ठावठिकाणा लागत नसल्याची चिंता वाढली होती. अखेर पो. नि. तांबे व त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांनी आरोपींना पकडून मुलाची सुटका करण्यात यश मिळविले. ठाण्यात जमलेल्या नागरिकांनी पोलिसांचे अभिनंदन केले.

नुरी चौकात राहणारी एक महिला आपल्या लहान मुलांना घेऊन पिरबुऱ्हाण येथील एका धार्मिक स्थळाजवळ आलेली होती. प्रार्थना संपल्यानंतर नागरिकांची गर्दी जमल्यानंतर त्या गर्दीचा फायदा घेऊन काळ्या पल्सर गाडीवर आलेल्या दोन अज्ञातांनी सुमारे दीड वर्षाच्या मुलाचे अपहरण केले. या घटनेनंतर पिरबुऱ्हान भागात एकच खळबळ उडाली होती. दरम्यान सदर महिलेने बालकाचे अपहरण झाल्याची तक्रार केल्यानंतर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन ठाण्यातील वेगवेगळे पथक शोधासाठी बाहेर पडले. यावेळी त्या भागासह शहरातील अनेक ठिकाणचे 'सीसीटीव्ही' पोलिसांनी तपासले असले तरी अपहरणकर्त्यांचा ठावठिकाणा हाती लागला नाही. अखेर या घटनेतील दोघे जण खडकपुरा भागातील सैलाबनगर येथे असल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

सतत रडत असलेल्या त्या लहान बाळाला पोलिसांनी ठाण्यात आणल्यानंतर तेथे आई-वडील दिसताच त्याने आईच्या दिशेने झेप घेऊन रडणे थांबविले. सदर गुन्ह्यातील आरोपी मो. अमीर मो. अफसर (देगलूर नाका) व मो. इस्माईल अ. हमीद (देगलूर नाका) या दोघांना पोलिसांनी अटक केली असून पोलीस अपहरणाचा हेतू काय होता, याचा तपास करत आहेत.

सदरची कामगिरी पो. अ. अबिनाश कुमार, अ. पो. अ. अर्चना पाटील, अपोअ सुरज गुरव, डिवायएसपी रामेश्वर व्यंजने यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि संतोष तांबे, पोनि महेश माळी, सपोनि बालाजी महाजन, पोउपनि विनोद देशमुख, नरेश वाडेवाले, पोउपनि संकेत सौराते, पोउपनि सचिन सोनवणे, पोलीस कर्मचारी गजानन किडे, विलास माळवे, पांचाळ, मुंडे, राहुल लाठकर, नागनाथ चापके आदींनी केली. गुन्ह्यात वापरलेली पल्सर (एमएच-२६-सीक्यू-९८४१) पोलिसांनी जप्त केली.